जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०२१/ 705
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 25/26 / ०२ / २०२१

प्रति,

**संस्थाचालक / प्राचार्य**
**शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व (GCC-SSD-CTC) मार्च २०२१ बॅच बदलाबाबत.**

**संदर्भ :- या कार्यालयाची अधिसूचना दि.१ डिसेंबर २०२०**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत (GCC-TBC) इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. विषयाची परीक्षा दि. ०२/०३/२०२१ ते १३/०१/२०२० या कालावधीत तसेच मराठी / हिंदी ३० व ४० श.प्र.मि. विषयाची परीक्षा दि.१७/०३/२०२१ ते २६/०३/२०२१ या कालावधीत तर (GCC-SSD-CTC) स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अँण्ड स्टुडन्टस् ही परीक्षा दि. ३१/०३/२०२१ रोजी एक दिवस ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

सदर परीक्षेसाठी खाली नमूद केलेल्या कारणास्तव बॅच बदल देण्यात येईल इतर कोणत्याही करणाने बॅच बदल दिला जाणार नाही. प्रवेशपत्र (हॉल तिकीट) मिळालेनंतर तीन दिवसांचे आत बॅच बदल साठी ई-मेल द्वारे अर्ज करुन बॅच बदलाची प्रक्रीया पूर्ण करावी, सदर दिलेल्या कालावधीत बॅच बदल न केल्यास बॅच बदल दिला जाणार नाही. याची सर्व संस्थाचालक / प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

बॅच बदल केवळ पुढील बाबतीतच मान्य केला जाईल याबाबत अंतिम अधिकार परीक्षा परिषदेस असतील.

१. विद्यापीठ परीक्षा
२. स्पर्धा परीक्षा
३. परीक्षा केंद्रावरील तांत्रिक कारण
४. आकस्मित दुर्घटना

याबाबतची मागणी परीक्षा परिषदेचा mscegcctbc@gmail.com या ई-मेलद्वारे आवश्यक पुराव्यासह करता येईल. बदल मान्य झाल्यास संबंधित परीक्षा केंद्रसंचालक / केंद्रसमन्वय आणि संबंधित उमेदवारांना ई-मेलद्वारे कळविले जाईल. ज्या ई-मेल द्वारे बॅच बदलाचा प्रस्ताव परिषदेस प्राप्त होईल. त्याच ई-मेल आयडीवर बॅच बदल मान्य / अमान्य बाबत कळविले जाईल. याची सर्व संबंधित संस्थाचालक / प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :-**

१. **विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व**
२. **शिक्षणाधिकारी (माध्य)जि.प.सर्व**
३. **सर्व संबंधित केंद्रसंचालक, सर्व परीक्षा केंद्र.**

Letter २०२१

Scanned with CamScanner

जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०२१/ 706
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 25/ ०२ / २०२१
26

प्रति,

**संस्थाचालक / प्राचार्य**
**शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व (GCC-SSD-CTC) मार्च २०२१** सध्याच्या गुणदान पध्दतीनुसार बॅकस्पेस आणि डिलीट कीज चा वापर करण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :- कार्यकारी समिती सभा क्र. २६ ठराव क्र. ४२१ दि. २२/१२/२०१७**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) ३० व ४० श.प्र.मि. मराठी / हिंदी / इंग्रजी या तिनही विषयांसाठी ई-मेल, लेटर, स्टेटमेंट या प्रश्नांसाठी बॅकस्पेस व डिलीट या कीज चा वापर करण्याची मुभा होती परंतु स्पीड पॅसेज मध्ये मात्र बॅकस्पेस व डिलीट या कीज वापरल्यास विद्यार्थ्यांचे गुण (Marks) कमी होत असत. तसेच स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स ॲण्ड स्टुडन्टस् **(GCC-SSD-CTC)** या परीक्षेतही मोबाईल कॉम्प्युटींग, लेटर, बॅलन्स शिट या प्रश्नांसाठी बॅकस्पेस व डिलीट या कीजचा वापर करण्याची मुभा होती परंतु स्पीड पॅसेज मध्ये मात्र बॅकस्पेस व डिलीट या कीज वापरल्यास विद्यार्थ्यांचे गुण (Marks) कमी होत असत.

परिषदेच्या कार्यकारी समिती सभा क्र. २५ ठराव क्र. ४०६ नुसार गुणदान व परीक्षा पध्दत बदल करण्याबाबतची एक समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालान्वये कार्यकारी समिती सभा क्र. २६ ठराव क्र. ४२१ नुसार स्पीड पॅसेज मध्येही बॅकस्पेस व डिलीट या कीजचा वापर करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

प्रत माहितीस्तव :-

१. अशासकीय सदस्य, कार्यकारी समिती, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे (सर्व)
२. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
३. शिक्षणाधिकारी (माध्य) सर्व / शिक्षण निरीक्षक (उ/द/प)
४. व्यवस्थापक, विनर सॉफ्टवेअर प्राय. लिमी. पुणे. (यांना कळविण्यात येते की, वरील बदलाप्रमाणे आपल्या सॉफ्टवेअर मध्ये बदल करावा.)

Scanned with CamScanner

जा.क्र./मराපप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०२१/ 707
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 25 ०२ / २०२१
26

प्रति,

संस्थाचालक / प्राचार्य
शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय :- शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व (GCC-SSD-CTC) मार्च २०२१ परीक्षा केंद्रावरील Keyboard आणि Mouse बाबत...**

**संदर्भ :- या कार्यालयाची अधिसूचना दि.१ डिसेंबर २०२०**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत **शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग इन्स्ट्रक्टर्स अँण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) मार्च २०२१** परीक्षा **दिनांक ०२ मार्च ते ३१ मार्च २०२१ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने** घेतली जाणार आहे. सदर परीक्षेसाठी ज्या संस्थांनी परीक्षार्थी प्रविष्ठ केले आहेत, त्या संस्थाना परीक्षा केंद्रावर स्वत:चे **Keyboard आणि Mouse** वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, याबाबत संस्थांनी पुढील बाबींची दक्षता व नोंद घ्यावी.

१. इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. ची परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक दिवस अगोदर (दि.०१ मार्च २०२१ रोजी स.११.०० पर्यंत) **Keyboard आणि Mouse** परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( I T टीचर) यांचेकडे जमा करावेत.

२. मराठी व हिंदी ३० व ४० श.प्र.मि. ची परीक्षा सुरु होण्यापूर्वी दोन दिवस अगोदर (दि. १६ मार्च २०२० रोजी स.११.०० पर्यंत) **Keyboard आणि Mouse** परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( I T टीचर) यांचेकडे जमा करावेत.

३. स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अँण्ड स्टुटन्टस् (GCC-SSD-CTC) परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक दिवस अगोदर (दि. ३० मार्च २०२१ सकाळी १०.०० पर्यंत) **Keyboard आणि Mouse** परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( I T टीचर) यांचेकडे जमा करावेत.

४. परीक्षा केंद्रावर जमा केलेले **Keyboard आणि Mouse** त्या परीक्षा केंद्रावरील सर्व परीक्षार्थ्यांना वापरण्यास उपलब्ध असतील.

५. संबंधित केंद्रावरील संपूर्ण् परीक्षा पूर्ण झाल्यानंतर हे **Keyboard आणि Mouse** संस्थाना परत मिळू शकतील म्हणजे संबंधित संस्थेस परीक्षा पूर्ण होण्यापूर्वी **Keyboard आणि Mouse** परत मिळू शकणार नाहीत.

६. संस्थांनी **Keyboard आणि Mouse** परीक्षा केंद्रांना उपलब्ध करुन देणे हे ऐच्छिक असेल. तसेच या साहित्याची हानी, तूट-फूट झाल्यास अथवा हरवल्यास त्याची कोणतीही भरपाई परीक्षा केंद्राकडून अथवा परीक्षा परिषदेकडून मिळणार नाही. याचीही संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

७. परीक्षा केंद्रावर स्वत:चे **Keyboard आणि Mouse** टंकलेखन संस्थांनी उपलब्ध करुन देण्यास परवानगी देण्यात आली असल्याचे परीक्षा केंद्रावरील **Keyboard आणि Mouse** बाबतच्या कोणत्याही तक्रारीची यापुढे दखल घेतली जाणार नाही.

(तुकाराम सुपे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१.

प्रत :-

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य) सर्व.
३. शिक्षण निरीक्षक (उ/द/प)
४. सर्व केंद्रसंचालक व केंद्रसमन्वयक ( I T टीचर) परीक्षा केंद्र (GCC-TBC) मार्च २०२१

Letter २०२१

Scanned with CamScanner